**लेखकांचे नागरिकांना आवाहन:**

**विद्वेषाच्या राजकारणाच्या विरोधात मतदान करा.**

**समताधिष्ठित, बहुविध भारतासाठी मतदान करा.**

यंदाच्या निवडणूकीत आपला देश एका वळणावर उभा आहे. देशाचे संविधान सर्व नागरिकांना समान हक्क देते. खाण्याचे, प्रार्थना करण्याचे आणि प्रत्येकाला हवे तसे जगण्याचे स्वातंत्र्य देते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि असहमतीचा अधिकार देते. परंतु गेल्या काही वर्षात आपण पाहिले आहे की लोकांना जात, धर्म, लिंग किंवा प्रदेशाच्या नावावर ठार मारले जात आहे, त्यांच्यावर हल्ले होत आहेत, त्यांच्याशी भेदभावाचा व्यवहार होत आहे. देशाचे विभाजन करण्यासाठी, भीती उत्पन्न करण्यासाठी आणि अधिकाधिक लोकांना पूर्ण नागरिक म्हणून जगण्यापासून वंचित करण्यासाठी विद्वेषाच्या राजकारणाचा वापर केला जात आहे. लेखक, कलाकार, चित्रपट निर्माते, संगीतकार व इतर सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचा सातत्याने छळ होतो आहे. त्यांना धमक्या दिल्या जात आहेत आणि त्यांच्यावर सेन्सॉर लादले जात आहे. सत्ताधाऱ्यांना जो कुणी प्रश्न विचारेल त्याचा छळ केला जात आहे किंवा खोट्या आणि हास्यास्पद  आरोपांखाली अटक केली जात आहे.

आपणां सर्वांनाच हे बदलायचे आहे. विवेकवादी, लेखक आणि कार्यकर्त्यांचा छळ किंवा हत्या आपल्याला नको आहेत. स्त्रिया, दलित, आदिवासी आणि अल्पसंख्यांक जमातींच्या विरुद्ध लिखित वा कृतीद्वारे केल्या जाणाऱ्या हिंसेविरुद्ध कठोर उपाययोजना झाल्या पाहिजेत. आपल्याला नोकऱ्या, शिक्षण, संशोधन, आरोग्य सेवा आणि सर्वांना समान संधी यासाठी संसाधने व उपाय हवे आहेत.

सर्वात महत्त्वाचं म्हणजे, आपल्या सर्वांनाच आपल्या देशाच्या बहुविधतेचे रक्षण करायचे आहे, लोकशाही विकसित होऊ द्यायची आहे.

हे कसे करायचे? आपल्याला हवा तो बदल इतक्या तातडीने कसा घडवून आणायचा? अनेक गोष्टी करणे आवश्यक आहे, आपण करूही शकतो. परंतु एक गंभीर पहिले पाऊल शक्य आहे.

पहिले पाऊल आपण लवकरच उचलू शकतो. ते म्हणजे विद्वेषाच्या राजकारणाला मतदान करायचे नाही. लोकांच्यातील विभाजनाला मत देण्याचे नाकारायचे. हिंसा, धमक्या आणि सेन्सॉरशिपच्या विरोधात मत द्यायचे. हाच एक मार्ग आहे. आपण अशा भारतासाठी मत देऊ शकतो, जो संविधानाने दिलेली अभिवचने आपल्याला पुन्हा देऊ शकतो. म्हणूनच आम्ही सर्व नागरिकांना बहुविध व समताधिष्ठित भारतासाठी मतदान करण्याचे आवाहन करत आहोत.